जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAY 2024
तरुण भारत



कोल्हापूर : भालकर्स कला अकादमीच्या पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांबरोबर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, संग्राम भालकर, संदीप भालकर, सपना जाधव-भालकर आदी.

# विद्यापीठातील फिल्म मेकिंग कोर्समागे भालकरांची प्रेरणा

## कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या आठवणींना उजाळा देत 'शिवाजी विद्यापीठात फिल्म मेकिंग अभ्यासक्रम सुरू करण्यामागे भालकर यांची प्रेरणा आहे. म्हणूनच विद्यापीठाने यंदापासून बीए फिल्म मेकिंग प्रमाणपत्र कोर्स सुरू केला आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर फौंडेशन, कोल्हापूर संचलित भालकर्स कला अकादमीमार्फत विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव, सांस्कृतिक कार्यक्रमांचे बहारदार सादरीकरण केले. संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह येथे झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर फौंडेशन, कोल्हापूर संचलित भालकर्स कला अकादमीमार्फत चित्रकार एस. निंबाळकर (कलामहर्षी बाबुराव पेंटर स्मृती कला सेवा पुरस्कार), रंगभूषाकर सदानंद सूर्यवंशी (चित्रतपस्वी भालजी पेंढारकर स्मृती चित्रसेवा पुरस्कार), नाट्यवितरक आनंद कुलकर्णी (मदन मोहन लोहिया स्मृती नाट्यसेवा पुरस्कार), ज्येष्ठ वादक प्रकाश साळोखे (संगीतकार यशवंत देव स्मृती संगीतसेवा पुरस्कार), पत्रकार उदय कुलकर्णी (कै. लक्ष्मण महालिंगा भालकर स्मृती सामाजिक लक्ष्यरत्न प्रेरणा पुरस्कार), नृत्यदिग्दर्शक सागर बगाडे (मास्टरजी सुबलदा सरकार स्मृती पुरस्कार) यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. या पुरस्कार सोहळ्याचे संकल्पक, दिग्दर्शक संग्राम भालकर यांनी प्रास्ताविक केले. फौंडेशनचे अध्यक्ष संदीप भालकर यांनी आभार मानले. यावेळी रेखा भालकर, फाऊंडेशनच्या उपाध्यक्ष सपना जाधव-भालकर, अलोक जत्राटकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
30 MAY 2024 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात नाट्य कार्यशाळेचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने दि. २९ ते ३१ मे या कालावधीत नाट्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेचे उद्‌घाटन संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रभारी विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. संजय तोडकर, डॉ. राजश्री खटावकर, युवराज केळुसकर, विकास कांबळे हे नाट्य प्रशिक्षक उपस्थित होते. तीन दिवस चालणाऱ्या या कार्यशाळेमध्ये अभिनय म्हणजे काय? दिग्दर्शनाची कार्यपद्धत, नाट्यलेखन विचार, रंगमंच तंत्राची ओळख अशा विषयांवर शिक्षक-नाट्यकर्मींचे मार्गदर्शन कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना लाभणार आहे. रविदर्शन कुलकर्णी यांनी मानवी जीवन आणि नाट्यकला, राज पाटील यांनी मराठी नाटकांचा इतिहास आणि रंगमंचीय खेळ यांवर प्रात्यक्षिकांसह कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAY 2024
तरुण भारत

# संगीत, नाट्यशास्त्रच्या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातील कार्यशाळेचे उद्घाटन संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेमध्ये अभिनय म्हणजे काय? दिग्दर्शनाची कार्यपद्धत, नाट्यलेखन विचार, रंगमंच तंत्राची ओळख अशा विविध विषयांवर तज्ज्ञ शिक्षक-नाट्यकर्मींनी मार्गदर्शन केले. ही कार्यशाळा ३१ जूनपर्यंत असून अनेक तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या कार्यशाळेसाठी राजापूर, मालवण, गडहिंग्लज, सांगली, कराड, कोल्हापुरातील विद्यार्थी सहभागी झाले आहेत. बुधवारी रविदर्शन कुलकर्णी यांनी मानवी जीवन आणि नाट्यकला, राज पाटील यांनी मराठी नाटकाचा इतिहास आणि रंगमंचीय खेळ यांवर प्रात्यक्षिकांसह कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

30 MAY 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात संगीत, नाट्य कार्यशाळेला सुरुवात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित कार्यशाळेस बुधवारी सुरुवात झाली. ही कार्यशाळा दि. २९ ते ३१ मे या कालावधीत सकाळी १०.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत चालणार आहे. कार्यशाळेचे उद्घाटन संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्र. विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांच्या हस्ते झाले.

उद्घाटनप्रसंगी डॉ. संजय तोडकर, रविदर्शन कुलकर्णी, डॉ. राजश्री खटावकर, राज पाटील, युवराज केळूसकर, विकास कांबळे हे नाट्य प्रशिक्षक उपस्थित होते. तीन दिवस चालणाऱ्या या कार्यशाळेमध्ये अभिनय म्हणजे काय? दिग्दर्शनाची कार्यपद्धत, नाट्यलेखन विचार, रंगमंच तंत्राची ओळख, अशा विषयांवर तज्ज्ञ शिक्षक-नाट्यकर्मींचे मार्गदर्शन कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना लाभणार आहे. राजापूर, मालवण, गडहिंग्लज, सांगली, कराड, कोल्हापूर या विविध ठिकाणांहून विद्यार्थी या कार्यशाळेत सहभागी झाले आहेत.

बुधवारी पहिल्या दिवशी रविदर्शन कुलकर्णी यांनी मानवी जीवन आणि नाट्यकला, राज पाटील यांनी मराठी नाटकाचा इतिहास आणि रंगमंचीय खेळ यावर प्रात्यक्षिकांसह कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

30 MAY 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दुहेरी पदवीची विद्यार्थ्यांना संधी

## शिवाजी विद्यापीठात २०२० पासून प्रारंभ; दरवर्षी शंभर विद्यार्थी घेताहेत शिक्षण



### एकाच स्तरातील अभ्यासक्रम असावेत

■ दुहेरी पदवी घेताना अभ्यासक्रमांची निवड ही एकाच स्तरातील असावी लागणार आहे. म्हणजेच एक तर दोन्ही अभ्यासक्रम हे पदवीचे किंवा पदव्युत्तर असले पाहिजेत. एका विद्यापीठात पदवी व दुसऱ्या विद्यापीठात पदव्युत्तर अभ्यासक्रम अशी तरतूद नाही.

“ कमी कालावधीत दोन अभ्यासक्रम शिकून दोन पदव्या एकत्रित घेण्याची संधी नव्या शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना मिळाली आहे. यापूर्वीच विद्यापीठाने दुहेरी पदवीची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली होती. दरवर्षी सुमारे १०० विद्यार्थी दोन पदव्यांचे शिक्षण एकत्रित घेत आहेत.
**- डॉ. व्ही. एन. शिंदे,** कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

“ मी आयटीआयमध्ये मशिनिस्ट हा कोर्स प्रत्यक्षरीत्या करतो आहे. यावेळी मी शिवाजी विद्यापीठातून बी. कॉमची पदवी देखील घेतो आहे. फक्त विद्यापीठामध्ये एक अर्ज करून दोन्ही परीक्षा एकावेळी देता येत आहेत. त्यामुळे माझा वेळ वाचणार आहे.
**- ऋषिकेश जोशी,** विद्यार्थी

**■ नंदिनी नरेवाडी :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : विद्यार्थ्यांचा वेळ आणि पैसा दोन्हींची बचत करणाऱ्या 'दुहेरी पदवी' कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद वाढता आहे. शिवाजी विद्यापीठात २०२० पासून सुरू झालेल्या या कार्यक्रमात दरवर्षी सुमारे शंभर विद्यार्थी दुहेरी पदवीचे शिक्षण एकाचवेळी घेत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना हव्या असलेल्या वेगवेगळ्या विषयांचा एकाचवेळी अभ्यास करता येऊ लागला आहे आणि एकाचवेळी अनेक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळू लागली आहे. या सुविधेमुळे यंदाच्या शैक्षणिक वर्षात दोन पदव्यांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या निश्चितच वाढणार आहे.

जुलै २०२० मध्ये जाहीर झालेल्या नव्या शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या इच्छेनुसार वेगवेगळ्या विषयांना एकाचवेळी प्रवेश घेता येऊ शकतो. यापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाने एकावेळी दोन अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यास विद्यापीठांना मनाई केली होती. त्यामुळे इच्छा असूनही विद्यार्थ्यांना दोन अभ्यासक्रम एकत्रित करणे शक्य नव्हते. मात्र नव्या शैक्षणिक धोरणानुसार ही संधी उपलब्ध झाली. त्याची अंमलबजावणी जरी या वर्षीपासून होणार असली तरीही शिवाजी विद्यापीठाने २०२० पासून विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीची संधी उपलब्ध करून दिली. याचा फायदा अनेक विद्यार्थ्यांना झाला.

मात्र, असा प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना काही नियमांचे पालन करावे लागते. बऱ्याचदा दोन अभ्यासक्रमांची वेळ एकच असू शकते. त्यामुळे कोणत्या अभ्यासक्रमाला हजर राहायचे, असा प्रश्न विद्यार्थ्यांना पडू शकतो. याला पर्याय म्हणून एका अभ्यासक्रमाला नियमित प्रवेश व एक अभ्यासक्रम हा दूरशिक्षणातून किंवा ऑनलाईन पद्धतीने पूर्ण करता येऊ शकतो. यामुळे पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना अन्य विषयांमधूनही पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची निवड करता येईल. विद्यार्थी निवड करताना कोणतीही सक्ती विद्यार्थ्यांवर असणार नाही. त्यानुसार, विद्यार्थी दोन्ही अभ्यासक्रम विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थितीच्या माध्यमातून पूर्ण करू शकणार आहेत. एक अभ्यासक्रम प्रत्यक्ष वर्गात उपस्थित राहून, तर दुसरा अभ्यासक्रम दूरशिक्षण अथवा ऑनलाईन स्वरूपात करता येईल. दोन्ही अभ्यासक्रम ऑनलाईन किंवा दूरशिक्षण पद्धतीमध्ये असू शकतात.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 0 MAY 2024
लोकमत

# खोटे प्रमाणपत्र प्रकरणी विद्यापीठाकडून तक्रार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे नाव आणि बोधचिन्ह वापरून मैदानी क्रीडा प्रकारातील खोटे प्रमाणपत्र देणाऱ्याच्या विरोधात बुधवारी विद्यापीठ प्रशासनाने राजारामपुरी पोलिस ठाण्यात तक्रार अर्ज दिला आहे. या प्रकाराची गांभीर्याने चौकशी करून पुढील कारवाई करण्याची मागणी प्रशासनाने पोलिसांकडे केली आहे.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयातील एक खेळाडू खासगी प्रशिक्षकाच्या माध्यमातून सराव करीत होता. नाशिक येथे झालेल्या स्पर्धेसाठी त्याला नेण्यात आले. तेथे त्याला गुवाहाटीमधील 'खेलो इंडिया स्पर्धे'साठी निवड झाल्याचे सांगण्यात आले. गुवाहाटी येथे ७ ते १० मेच्या दरम्यान या स्पर्धेसाठी नेले. त्यानंतर ८ जूनला प्रमाणपत्र येणार असल्याचे त्या प्रशिक्षकाने सांगितले. त्यानंतर नाशिक येथे झालेल्या स्पर्धेचे प्रमाणपत्र शिवाजी विद्यापीठाचे प्रमाणपत्र म्हणून या खेळाडूला दिले. त्यावर विद्यापीठाचे नाव, बोधचिन्हाचा वापर केला आहे. या प्रकाराची तक्रार एका खेळाडूच्या पालकांनी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांच्याकडे केली होती.